।।ज्ञानदिप लावू जगी।।

## कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे,

## स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय

म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे

(नॅक प्रमाणित B ग्रेड (CGPA – 2.41))

# राष्ट्रीय सेवा योजना



नियमित कार्यक्रम

वर्ष २०२०- २०२१

## अहवाल

प्राचार्य

NOT ME



BUT YOU

डॉ. शिवाजी पाटील

| कार्यक्रम अधिकारी | महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी | सहाय्यक कार्यक्रम अधिकारी |
| --- | --- | --- |
|  |  |  |
| डॉ. रमेश अहिरे | डॉ. वनिता पवार | डॉ. बाबासाहेब मोताळे |

# राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रम

## अहवाल (२०२०-२१)

आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे,

स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय

म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे

**अनुक्रमणिका**


| अ.क्र. | विवरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १ |
| २. | कार्यक्रमांचा संक्षिप्त अहवाल | २-१३ |


**NOT ME BUT YOU**



माझ्यासाठी नव्हे, तर तुमच्यासाठी हे ब्रीदवाक्य लक्षात घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सेवेची मूल्ये आणि सामाजिक भान ठेऊन समाजसेवेसाठी तत्पर असतो. आपले उज्ज्वल भविष्य गाठत असतानाच समाज व राष्ट्राला आपण काही देणे लागतो म्हणून फुल न फुलाची पाकळी या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे राष्ट्रसेवा करण्याचे कार्य महविद्यालयीन युवक करीत असतो. राष्ट्रीय सेवा योजनेच्या बोधचीन्हाप्रमाणे आजचा स्वयंसेवक हा बोधचिन्हाच्या आठ आरेनुसार अष्टौप्रहर समाजसेवेसाठी बांधील आहे व लाल रंग हे तरुणांचे सळसळते रक्त हे राष्ट्र उभारणीचे प्रतिक असल्याचे दिसून येते. राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, सामाजिक बांधिलकी यासाठी स्वयंसेवक तत्पर व सक्षम व्हावा, यासाठी राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम व विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर या दोन उपक्रमांद्वारे समाजप्रबोधन करण्याचे कार्य करीत आहे.

स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय म्हसदी, येथील राष्ट्रीय सेवा योजना एककाचे १५० स्वयंसेवकाची तुकडी असून; कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. सी. अहिरे, महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, प्रा. डॉ. व्ही. टी. पवार आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बी. टी. मोताळे व इतर प्राध्यापक वृंद यांच्या मार्गदर्शनाखाली समाजउपयोगी विविध उपक्रम नियमित कार्यक्रमांतर्गत राबवित असते. प्रत्येक वर्षी दत्तक गावात सात दिवसीय निवासी विशेष शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकांचा व्यक्तिमत्व विकास करतांना त्यांना ग्रामीण जीवनातील समस्यांची ओळख करून देत त्या सोडविण्यासाठी निस्वार्थ काम करण्यास युवकांना प्रेरित करते.

नियमित कार्यक्रम अहवालास शुभेच्छा !!!!!

डॉ. शिवाजी पाटील

प्राचार्य

## १. प्रस्तावना

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात समाज सेवेची जाणीव निर्माण व्हावी, समाजाच्या सुख दु:खाशी त्यांनी समरस व्हावे. समाजाच्या तळागाळातील व्यक्तीपर्यंत त्यांची नाळ जोडली जावी, सामाजिक प्रश्नांच्या जाणीवेतून कर्तव्य भावना आणि श्रम प्रतिष्ठा निर्माण व्हावी, तसेच समाज सेवेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास व्हावा आणि राष्ट्रसेवा घडावी, या उद्देशाने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने २४ सप्टेंबर १९६९ रोजी भारताचे तत्कालीन शिक्षण मंत्री मा. व्ही. के. आर. व्ही. राव यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात केली.

## महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाची स्थापना

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव अंतर्गत म्हसदी येथे आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्था, धुळे संचलित स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, ता. साक्री, जि. धुळे येथील म्हसदी गावी सन १९९८ मध्ये महाविद्यालयाची सुरुवात झाली. म्हसदी पंचक्रोशीतील ग्रामीण व डोंगरी भागातील विद्यार्थी विशेषतः मुलींसाठी उच्च शिक्षणाची सोय व्हावी. ग्रामीण व डोंगरी भागातील शेवटच्या घटकापर्यंत उच्च शिक्षणाची ज्ञान गंगोत्री पोहचावी. याउद्देशाने महाविद्यालय महाविद्यालय सुरु झाले. सन २००० साली महाविद्यालयाला ५० स्वयंसेवकांचे एकक सुरु करण्याची मान्यता तत्कालीन उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने दिली. अशा रीतीने महाविद्यालयात सन २००० पासून राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महविद्यालय, म्हसदी येथे कार्यरत आहे. कालांतराने विद्यापीठाच्या नियमांचे पालन करत एककाची स्वयंसेवकांची संख्या वाढवत आज १५० स्वयंसेवकांचे एकक महविद्यालयात कार्यरत आहे.

दरवर्षी राष्ट्रीय सेवा योजनेत १५० स्वयंसेवक नोंदणीकृत केले जातात. या १५० पैकी ७५ स्वयंसेवकांची तुकडी सात दिवसीय निवासी शिबिरासाठी निवडले जातात.राष्ट्रीय सेवा योजना एककाला दर तीन वर्षाकरिता एक गाव दत्तक म्हणून घेतले. या दत्तक गावात पर्यावरण, आरोग्य, जलसंवर्धन व संधारण, शासन राबवीत असलेले योजना व उपक्रम याविषयी माहिती व जनजागृतीचे उपक्रम नियमित कार्यक्रम आणि शिबिरांतर्गत राबविले जातात. सन २०२०-२१ ते २०२२-२३ या तीन वर्षाच्या कालावधीकरीता धनदाई डोंगर, मु. पो. म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे हे गाव दत्तक गाव म्हणून मिळालेले आहे. या गावात राष्ट्रीय सेवा योजनेचे विविध जनजागृतीपर नियमित उपक्रम व सात दिवसीय नियमित शिबीर घेतले. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या शैक्षणिक कालावधीत राबविण्यात आले. कार्यक्रमांचा संशिप्त वृतांत पुढील प्रमाणे सादर आहे.

## २. कार्यक्रमांचा संक्षिप्त अहवाल

राष्ट्रीय सेवा योजनेचे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी खालील प्रमाणे नियोजित प्रकल्प ठरविण्यात आले होते.

### ≈ नियोजित प्रकल्प ≈

- माझे गांव कोरोनामुक्त गांव
- पर्यावरण व आरोग्य जनजागृती
- ग्राम स्वच्छता
- माझी वसुंधरा अभियान
- रक्तदान
- स्वच्छ भारत अभियान
- आपत्ती व्यवस्थापन, अंधश्रद्धा निर्मुलन
- जल संवर्धन, बेटी बचाव बेटी पढाव
- गंदगी मुक्त अभियान
- कोरोना लसीकरण जनजागृती

**NOT ME BUT YOU**

## एप्रिल २०२० ते जून २०२०

कबचौ, उमवि, जळगाव विद्यापीठाच्या रासेयो विभागाने सुचविल्या नुसार कोरोना विषाणूचा प्रार्दुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना संदर्भात केंद्र, राज्य शासन व स्थानिक प्रशासन यांच्या निर्देशानुसार आमच्या महाविद्यालयातील रासेयो, एककाने कोरोना महामारीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून महाविद्यालयातील सर्व विध्यार्थी, स्वंसेवक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, गावातील नागरीक यांच्या मदतीने विविध जनजागृतीपर कार्य केले. ते पुढील प्रमाणे –

**दि. एप्रिल २०२० ते जून २०२०**

**कोरोना विषाणूचा प्रार्दुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कार्याचा सविस्तर तक्ता.**

| अ. क्र. | उपक्रम/ कामाचे स्वरूप व तपशील | सहभागी विद्यार्थ्यांची संख्या | लाभार्थी | दिनांक व स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | आरोग्यासेतू ॲप विषयी माहिती देणे व ॲप डॉउनलोड करण्यास प्रोत्साहित करणे. | ८० | १२९० | एप्रिल २०२० ते जून २०२० साक्री तालुका व धुळे शहर |
| २ | ग्रामीण भागात कोरोना संसर्गापासून बचावाचे मार्गदर्शन | १५० | १४२० | एप्रिल २०२० ते जून २०२० साक्री तालुक्यातील गावे. |
| ३ | गावाचे निर्जन्तुकीकरण मोहिमेत सहभाग | ६० | गावांची संपूर्ण लोकसंख्या | एप्रिल २०२० ते जून २०२० म्हसदी, देऊर, काळगाव आणि नेर |
| ४ | दीक्षा ॲपव्दारे Covid-19 Awareness Training सहभाग | ६३ | ६३ | एप्रिल २०२० ते जून २०२० साक्री तालुका व धुळे शहर |
| ५ | ग्रामीण भागात स्वयंसेवकांचे ग्रामरक्षक म्हणून सहभाग | ४० | गावांची संपूर्ण लोकसंख्या | एप्रिल २०२० ते जून २०२० म्हसदी, देऊर, काळगाव आणि नेर |

**जुलै २०२०**

## ८ जुलै २०२० वृक्षारोपण

दिनांक ८ जुलै २०२० कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महारष्ट्र विध्यापिठ, जळगाव राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मार्गदर्शनाखाली आजी व माजी स्वयंसेवकांनी, त्यांच्या पर्यावरण व वसुंधरेच्या रक्षणासाठी मोठया प्रमाणावर योगदान देऊन **१७७ वृक्षांचे रोपण** केले व वृक्ष संवर्धनाचा संकल्प केला आहे. गावानुसार वृक्षारोपणाचा विवरण पुढील प्रमाणे आहे.

**गावानुसार वृक्षारोपण विवरण तक्ता**

| अ क्र. | गांवाचे नांव | एकुण वृक्षरोपण संख्या |
|---|---|---|
| १ | काळगाव | ६० |
| २ | नेर | ४५ |
| ३ | देऊर बु. | ०३ |
| ३ | देऊर खुर्द | १० |
| ४ | भदाणे | ०५ |
| ५ | म्हसदी | २२ |
| ६ | साक्री | १५ |
| ७ | वसमार | १४ |
| ८ | पिंपळनेर | ०३ |
| एकुण वृक्ष लागवड संख्या | | १७७ |

## जुलै २०२० – प्रेरणा शिबीर

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महारष्ट्र विध्यापिठ, जळगाव राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मार्गदर्शनाखाली चार स्वयंसेवकांनी प्रेरणा शिबिरात सहभाग घेतला.

## ११ जुलै २०२० - जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त - राज्यस्तरीय तंबाखू व्यसनमुक्तीसाठी ई-शपथचे आयोजन.

विध्यापिठाच्या रासेयो विभागाने सुचविल्या नुसार **जागतिक लोकसंख्या दिनाचे** औचित्य साधून **शनिवार दि. ११/०७/२०२०** रोजी रासेयो, एककाने कोरोना महामारीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून **तंबाखू व्यसनापासून परावृत्त करण्याच्या उद्देशाने राज्यस्तरी तंबाखू व्यसनमुक्तीसाठी ई-शपथचे आयोजन केले.** ई-पध्दतीने (Online) पध्दतीने शपथ घेण्यासाठी एक Google Form तयार करण्यात आला. या Google Form वर तंबाखू व्यसन मुक्तीची प्रतिज्ञा घेण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली. या Google Form वर तंबाखू व्यसन मुक्तीची प्रतिज्ञा घेतल्यावर ई-प्रमाणपत्र देण्याची सोय करण्यात आली**. यात २६४ व्यक्तींनी सहभाग घेतला**. शपथ घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस ई-प्रमाणपत्र बहाल करण्यात आले.

## १८ जुलै २०२० - सार्वजनिक आरोग्य दिनानिमित्त - राष्ट्रीय घोषवाक्य स्पर्धा.

विध्यापिठाच्या रासेयो विभागाने सुचविल्या नुसार **सार्वजनिक आरोग्य दिनाचे** औचित्य साधून **दि. १८/०७/२०२०** रोजी रासेयो, एककाने कोरोना महामारीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून **राष्ट्रीय घोष वाक्य स्पर्धेचे आयोजन केले.** ई-पध्दतीने (Online) पध्दतीने **घोष वाक्य स्पर्धेचे** सहभाग घेण्यासाठी एक Google Form तयार करण्यात आला. या Google Form वर **घोष वाक्य** लिहिण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली. या Google Form वर **घोष वाक्य** दिल्यावर ई-प्रमाणपत्र देण्याची सोय करण्यात आली**. यात १८४ व्यक्तींनी सहभाग घेतला**.

शपथ घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस ई-प्रमाणपत्र बहाल करण्यात आले.

यात अनुक्रमे राष्ट्रीय स्तरावर प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक काढण्यात आले.

### ऑगस्ट - २०२०

## ८ ते १५ ऑगस्ट २०२० - गंदगी मुक्त अभियान

रासेयो विभागाने सुचविल्या नुसार **गंदगी मुक्त भारत अभियान संदर्भात केंद्र, राज्य शासन व स्थानिक प्रशासन यांच्या निर्देशानुसार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्न** आमच्या महाविद्यालयातील रासेयो, एककाने कोरोना-१९ विषाणू महामारीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून दि. ८ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२० या कालावधीत **गंदगी मुक्त भारत अभियान संदर्भात** जनजागृतीपर कार्य केले त्याचा सविस्तर गोषवारा खालील प्रमाणे सादर करीत आहोत.

**Annexure –** Schedule of Gandagi Mukt Bharat (GMB)

| Sr. No. | Name of Function | Date | No. of Participants |
|---|---|---|---|
| 1. | Participated in Online Webinar On Gandagi Mukt Bharat Campaign | 08/08/2020 | 83 |
| 2. | Collect And Segregate Single Use Plastic | 09/08/2020 | 74 |
| 3. | Shramdan In Panchayats To Whitewash / Cleaning Of Public Buildings | 10/08/2020 | 35 |
| 4. | Wall Painting Day Of SBM Messages In Villages | 11/08/2020 | 36 |
| 5. | Shramdaan In Villages: Tree Plantation | 12/08/2020 | 60 |
| 6. | Essay Competition On The Theme Of "Gandagi Mukt Mera Gaon" | 13/08/2020 | 43 |
| 7. | Cleanliness And Sanitization Drives In PHCs | 14/08/2020 | 26 |
| 8. | Independence Day – Pledge On Gandagi Mukt Bharat | 15/08/2020 | 45 |

## १३ ते १९ ऑगस्ट २०२० - जागतिक महाअवयवदान दिना निमित्त सप्ताहाचे आयोजन

१३ ऑगस्ट जागतिक महाअवयवदान दिनानिमित्त, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या निर्देशानुसार म्हसदी महाविद्यालयातील रासेयो, एककाने कोरोना-१९ विषाणू महामारीची परिस्थिती व दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून सर्व विध्यार्थी, स्वंसेवक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, यांच्या मदतीने दि. १३ ऑगस्ट ते २० ऑगस्ट २०२० या कालावधीत जागतिक महाअवयवदान दिनानिमित्त जनजागृतीपर विविध स्पर्धा संपन्न झाल्या. यात अवयवदान श्रेष्ठ दान या विषयावर जनजागृतीच्या उद्देशाने रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, ऑनलाइन व्याख्याने, चर्चासत्रे, कार्यशाळा आदि उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. ह्या स्पर्धा सर्वांसाठी खुल्या होत्या. स्पर्धेत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिक्षेत्रातील विविध महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. दि. १३ ऑगस्ट रोजी रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. रांगोळी स्पर्धेत म्हसदी महाविद्यालयातील कु. हर्षदा खैरनार, प्रथम कु. साक्षी जगताप, व्दितीय व कु. माहेश्वरी देसले तृतीय क्रमांक घोषित झाले. दि. १४ ऑगस्ट रोजी अवयवदान श्रेष्ठ दान या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. निबंध स्पर्धेत विविध महाविद्यालयातील २२ स्पर्धकांनी सहभाग घेतला यात म्हसदी महाविद्यालयातील आकाश मोरे, प्रथम , कु. श्वेता गवळी, व्दितीय तर समाजकार्य महाविद्यालयातील कु. ऐश्वर्या परदेशी तृतीय क्रमांक घोषित करण्यात आले. दि. १५ ऑगस्ट रोजी अवयवदान श्रेष्ठ दान या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. वक्तृत्व स्पर्धेत विविध महाविद्यालयातील ४ स्पर्धकांनी सहभाग घेतला यात नगाव, कला व विज्ञान महाविद्यालयातील प्रसाद महाले, प्रथम व कु. अर्चना पाटील, व्दितीय तर म्हसदी महाविद्यालयातील कु. अश्विनी कोळी तृतीय क्रमांक मिळविले. दि. १६ ऑगस्ट रोजी अवयवदान श्रेष्ठ दान या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. चित्रकला स्पर्धेत विविध महाविद्यालयातील १८ स्पर्धकांनी सहभाग घेतला. चित्रकला स्पर्धेत समाजकार्य महाविद्यालयातील कु. ऐश्वर्या मोरे, प्रथम व म्हसदी महाविद्यालयातील कु. साक्षी जगताप, व्दितीय तर के. एच. एम. सी. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नंदुरबार येथील प्रशांत गावित हा तृतीय आला. दि. १७, १८ व १९ ऑगस्ट रोजी अवयवदान श्रेष्ठ दान या विषयावर ऑनलाईन व्याख्यान, चर्चासत्र, व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले व २० ऑगस्ट रोजी 'अवयवदान श्रेष्ठ दान' या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेसाठी google form link तयार करण्यात आली. त्या लिंकमध्ये घोषवाक्य लिहिण्याची सोय करण्यात आली. स्पर्धेत सहभागी स्पर्धकाने आपली माहिती google form मध्ये भरून घोषवाक्य लिहून form submit केल्यावर त्याच्या मेलवर इ-प्रमाणपत्र देण्याची सोय करण्यात आली. या स्पर्धेत विविध महाविध्यालयातील दोनशे पेक्षा जास्त स्वयंसेवकांनी सहभाग घेतला आहे.

## २० ऑगस्ट २०२० - 'अवयवदान श्रेष्ठ दान' या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन

२० ऑगस्ट रोजी **'अवयवदान श्रेष्ठ दान'** या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेसाठी google form link तयार करण्यात आली. त्या लिंकमध्ये घोषवाक्य लिहिण्याची सोय करण्यात आली. स्पर्धेत सहभागी स्पर्धकाने आपली माहिती google form मध्ये भरून घोषवाक्य लिहून form submit केल्यावर त्याच्या मेलवर इ-प्रमाणपत्र देण्याची सोय करण्यात आली. या स्पर्धेत विविध महाविध्यालयातील दोनशे पेक्षा जास्त स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

## सप्टेंबर - २०२०

### १ ते १५ सप्टेंबर २०२० - फिट इंडिया रन इंडिया

रासेयो विभागाने सुचविल्या नुसार **फिट इंडिया रन इंडिया अभियान संदर्भात केंद्र यांच्या निर्देशानुसार** आमच्या महाविद्यालयातील रासेयो, एककाने कोरोना - १९ विषाणू महामारीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून दि. १ सप्टेंबर २०२० ते १५ सप्टेंबर २०२० या कालावधीत **फिट इंडिया रन इंडिया अभियान राबविले यात काळगाव, नेर देऊर बु., देऊर खुर्द, भदाणे, म्हसदी, वसमार या गावातील ८६ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.**

## ऑक्टोबर - २०२०

### १० ऑक्टोबर २०२० - माझे कुटुंब माझी जबाबदारी – लॉकडाउन काळातील सामाजिक संवेदना व कुटुंबांचे सर्वेक्षण.

रासेयो विभागाने सुचविल्या नुसार **माझे कुटुंब माझी जबाबदारी या संदर्भात महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग व रासेयो कक्ष यांच्या निर्देशानुसार** आमच्या महाविद्यालयातील रासेयो, एककाने कोरोना - १९ विषाणू महामारीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून दि. १० ऑक्टोबर २०२० रोजी माझे कुटुंब माझी जबाबदारी – लॉकडाउन काळातील सामाजिक संवेदना व कुटुंबांचे सर्वेक्षण **राबविले यात काळगाव, नेर, देऊर बु., देऊर खुर्द, भदाणे, म्हसदी, वसमार या गावातील ८ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला व ८६ कुटुंबांचे सर्वेक्षण केले.**

### १५ ऑक्टोबर २०२० - डॉ. अब्दुल कलाम जन्म दिवस - वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा (झूम मिटिंग)

१५ ऑक्टोबर हा दिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून उत्साहात साजरा केला. या प्रसंगी डॉ. रमेश अहिरे यांनी डॉ. अब्दुल कलाम यांचे मौलिक विचारांचे वाचन केले. वाचन प्रेरणा व संस्कृतीचा विकास ही एक सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिन देशभरात वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा केला जातो. दुर्दम्य इच्छाशक्ती असणाऱ्या आणि ठाम आत्मविश्वास असणाऱ्या डॉ. कलाम यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू होते. शालेय विद्यार्थ्यांनी डॉ. कलाम यांची पुस्तके वाचावीत, त्याचबरोबर इतर साहित्याचेही जास्तीत जास्त वाचन करावे. असे मार्गदर्शन डॉ. रमेश अहिरे यांनी केले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, या दृष्टीने वाचन प्रेरणा दिवसाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना विभागाने झूम मिटींगच्या माध्यमातून डॉ. कलाम यांचे मौलिक विचारांचे वाचनाचे आयोजन करण्यात आले होते.

## १५ ऑक्टोबर २०२० - जागतिक हात धुवा दिन साजरा (प्रात्यक्षिक)

दिनांक १५ ऑक्टोबर २०२० रोजी जागतिक हात धुवा दिन साजरा करण्यात आला. कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर स्वच्छतेबाबतच्या सर्व आवश्यक सवयींचे पालन करणे आवश्यक आहे. यानिमित्ताने जागतिक हात धुवा दिन साजरा करण्याच्या निमित्ताने विध्यार्थ्यांमध्ये याबाबतची जागृती करण्याच्या उद्देशाने कोरोना संसर्ग टाळण्यासाठी मास्क घालणे आणि गर्दी टाळणे या सवयीबरोबरच वारंवार हात स्वच्छ करणे किती आवश्यक आहे. याचे महत्व पटवून देण्यात आले. जागतिक हात धुवा दिनाच्या निमित्ताने संसर्गजन्य आजारांपासून बचाव कसा केला जाऊ शकतो. दृष्टीने जागतिक हात धुवा दिनाचे औचित्य साधून म्हसदी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने झूम मिटींगच्या माध्यमातून हा जागतिक हात धुवा दिन हात धुण्याचे प्रात्यक्षिक दाखवून साजरा केला. या प्रसंगी डॉ. रमेश अहिरे यांनी आरोग्य संवर्धनात स्वच्छ हातांची भूमिका अधोरेखित करत ज्या कामात हातावर जे विषाणू, जीवाणू व घाण स्थिरावण्याची शक्यता असते, असे प्रत्येक काम केल्यावर व बाहेरून घरी आल्यावर साबण आणि पाण्याने हात स्वच्छ धुतले कि अनेक जीवघेण्या संसर्गजन्य आजारांपासून स्वत:चे रक्षण करता येते. दर एक तासाने आपले हात साबण व पाण्याने स्वच्छ धुतले पाहिजे. या प्रसंगी हात धुण्याचे ८ स्टेप्सनुसार ही प्रक्रिया २० सेकंदात पुर्ण होणे आवश्यक असल्याची माहिती विध्यार्थ्यांना करून देण्यात आली. याचबरोबर स्वच्छ हात धुने विषयी समाजामध्ये जनजागृती करावी असे स्वयंसेवकांना सांगण्यात आले. यात म्हसदी, देऊर खु., नेर, वसमार या गावातील एकूण ८ स्वयंसेवकांनी सहभाग घेऊन आपल्या गावात प्रात्यक्षिक करून जनजागृती केली.

## २९ ऑक्टोबर २०२० - दक्षता जाणीव सप्ताह निमित्त – सतर्क भारत, समृध्द भारत शपथ.

दिनांक २९ ऑक्टोबर २०२० रोजी दक्षता जाणीव सप्ताह निमित्त – सतर्क भारत, समृध्द भारत शपथचे आयोजन करण्यात आले. सतर्क भारत समृद्ध भारत या अभियाना अंतर्गत भ्रष्टाचार मुक्त भारत शपत घेण्यात आली. यात महाविद्यालयातील ५५ कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

**नोव्हेंबर - २०२०**

## ११ नोव्हेंबर २०२० - राष्ट्रीय शिक्षण दिवस

११ नोव्हेंबर हा दिवस राष्ट्रीय शिक्षण दिवस म्हणून साजरा केला. ११ नोहेंबर थोर स्वातंत्र्य सेनानी, शिक्षण तज्ञ व स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षण मंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांचा जन्म दिवस दरवर्षी राष्ट्रीय शिक्षण दिवस म्हणून साजरा केला जातो. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील यांनी मौलाना अबुल कलाम आझाद यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान, शिक्षणाविषयी विषयी विचार व कार्य यावर प्रकाश टाकला. याप्रसंगी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## १४ नोव्हेंबर २०२० - राष्ट्रीय व राज्यस्तरीय पथसंचलनस निवड कॅम्पसाठी स्वयंसेवक पाठविले.

राष्ट्रीय व राज्यस्तरीय पथसंचलनस निवड कॅम्पसाठी महाविद्यालयातील दोन स्वयंसेविक पाठविले. यात कु. दीपमाला पाटील व कु. श्रुती दाभाडे या मुलींचं सहभाग होता. दोघांचेही पथसंचलन कॅम्पसाठी निवड झाली. यातून कु. दीपमाला पाटील ह्या विद्यार्थिनीला हैद्राबाद येथे राष्ट्रीय व राज्यस्तरीय पथसंचलनस निवड कॅम्पसाठी पाठविण्यात आले.

## २६ नोव्हेंबर २०२० - संविधान दिवस

भारतीय राज्यघटना दि. २६ नोहेंबर १९४९ रोजी अंगीकृत व अधिनियमित करण्यात आली. म्हणून दर वर्षी २६ नोहेंबर हा दिवस संविधान दिवस म्हणुन साजरा करण्यात येतो. कोविड - १९ महामारी संसर्गापासून बचाव म्हणून सुरक्षित अंतर ठेवून व चेहऱ्यावर मास्क परिधान करून. संविधान दिवस साजरा करण्यात आला. दि. २६ नोहेंबर २०२० रोजी सकाळी १०.०० वाजता महाविध्यालयात भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पमाळ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शिवाजी पाटील यांच्या हस्ते अर्पण करण्यात आले. या प्रसंगी रासेयो चे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन करून भारतीय राज्यघटनेने दिलेले मुलभूत अधिकार व कर्तव्य यांची माहिती सादर केली. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयोचे स्वयंसेवक असे एकुण ३५ व्यक्ती या कार्यक्रमास उपस्थित होते.

## डिसेंबर - २०२०

### १९ डिसेंबर २०२० - रक्तदान शिबीर

राज्यात रक्ताचा तुटवडा भासत असल्याने उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सर्व महाविद्यालयांना दि. २०/१२/२०२० रोजी रक्तदान शिबीरे आयोजित करण्याचे सुचविले होते. त्या अनुषंगाने म्हसदी येथील **स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने रक्तदान शिबिराचे आयोजन केले.** दि. २०/१२/२०२० रोजी रक्तपेढी उपलब्ध नसल्याने रक्तदान शिबीर **दि. १९/१२/२०२० रोजी शनिवारी** घेण्यात आले. या शिबीरात १२ रक्त दात्यांनी रक्तदान केले.

## जानेवारी - २०२१

### ०३ जानेवारी २०२१ - सावित्रीबाई फुले जयंती – महिला मुक्ती दिन म्हणून साजरा

दि. ३ जानेवारी २०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता महाविध्यालयात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पमाळ अर्पण करून महिला मुक्ती दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी रासेयो चे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी सावित्रीबाई फुले यांची माहिती सादर केली. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयोचे स्वयंसेवक असे एकुण १६ व्यक्ती उपस्थित होते.

### १२ जानेवारी २०२१ - स्वामी विवेकानंद जयंती – राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा

दि. १२ जानेवारी २०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता झूम मिटिंगवर स्वामी विवेकानंद यांचा जन्म दिन राष्ट्रीय युवा दिवस म्हणून साजरा करण्यात आला. या प्रसंगी रासेयो चे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी स्वामी विवेकानंद यांचे मौलिक विचार यांची माहिती सादर केली. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयोचे स्वयंसेवक असे एकुण २१ व्यक्ती उपस्थित होते.

## २३ जानेवारी २०२१ - नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरा

दि. २३ जानेवारी २०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता महाविध्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेस पुष्पमाळ अर्पण करून नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरा करण्यात आला. या प्रसंगी रासेयो चे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची माहिती सादर केली. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयोचे स्वयंसेवक असे एकुण १६ व्यक्ती उपस्थित होते.

## २६ जानेवारी २०२१ - गणराज्य दिन – ध्वज वंदन

दरवर्षी २६ जानेवारी हा दिवस गणराज्य दिन म्हणून साजरा केला जातो. २६ जानेवारी २०२१ रोजी सकाळी ७.३० वाजता महाविध्यालयात ध्वजारोहण करून गणराज्य दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी असे एकुण ३१ व्यक्ती उपस्थित होते.

## ३० जानेवारी २०२१ - महात्मा गांधी पुण्यतिथी साजरा

दि. ३० जानेवारी २०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता महाविध्यालयात महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पमाळ अर्पण करून महात्मा गांधींची पुण्यतिथी साजरा करण्यात आला. या प्रसंगी रासेयो चे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी महात्मा गांधी यांचे देशासाठी दिलेले योगदान याविषयी माहिती दिली. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयोचे स्वयंसेवक असे एकुण १६ व्यक्ती उपस्थित होते.

## फेब्रुवारी - २०२१

### १७ फेब्रुवारी २०२१ - वासुदेव बळवंत फडके पुण्यतिथी साजरा

दि. १७ फेब्रुवारी २०२१ रोजी सकाळी ९.०० वाजता महाविध्यालयात वासुदेव बळवंत फडके यांच्या प्रतिमेस पुष्पमाळ अर्पण करून वासुदेव बळवंत फडके यांची पुण्यतिथी साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयोचे स्वयंसेवक असे एकुण १६ व्यक्ती उपस्थित होते.

### १९ फेब्रुवारी २०२१ - छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरा

दि. १९ फेब्रुवारी २०२१ रोजी सकाळी ९.०० वाजता महाविध्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पमाळ अर्पण करून छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरा करण्यात आली. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयोचे स्वयंसेवक असे एकुण १८ व्यक्ती उपस्थित होते.

### २८ फेब्रुवारी २०२१ - राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

दि. २८ फेब्रुवारी २०२१ रोजी सकाळी ९.०० वाजता महाविध्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयोचे स्वयंसेवक असे एकुण १८ व्यक्ती उपस्थित होते.

## मार्च - २०२१

**०८ मार्च २०२१ - जागतिक महिला दिन – भारतातील प्रथम महिला यावर online प्रश्न मंजुषेचे आयोजन**

विध्यापिठाच्या रासेयो विभागाने सुचविल्या नुसार **जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि.०८/०३/२०२१ सोमवार** रोजी कोरोना महामारीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून **भारतातील पहिल्या महिला** या थीमवर आधारित **राज्यस्तरी प्रश्न मंजुषाचे आयोजन केले. ई-पध्दतीने (Online) प्रश्न मंजुषेत सहभाग** घेण्यासाठी एक **Google Form** तयार करण्यात आला. या **Google Form वर प्रश्न मंजुषेत सहभाग घेण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली.** या **Google Form वर मंजुषा जमाकेल्यावर ई-प्रमाणपत्र** देण्याची सोय करण्यात आली. प्रश्न मंजुषेत सहभाग घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस ई-प्रमाणपत्र ई-मेलवर देण्यात आले. सदर **Google Form ची link** तयार करून आमच्या महाविद्यालयातील सर्व विध्यार्थी, स्वंसेवक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, गावातील नागरीक व राज्यातील विविद शैक्षणिक **Whatsapp ग्रुप** वर उपलब्ध करून देण्यात आली. सदर राज्यस्तरीय प्रश्न मंजुषेला १७६ व्यक्तींचा प्रतिसाद दिला. याचबरोबर दि. ८ मार्च रोजी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले, जिजामाता व इंदिरा गांधी या प्रतिभावान महिलांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

## १० मार्च २०२१ - सावित्रीबाई फुले स्मुर्ती दिन साजरा

दि. १० मार्च २०२१ रोजी सकाळी ९.०० वाजता महाविध्यालयात सावित्रीबाई फुले स्मुर्ती दिनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पमाळ अर्पण करून साजरा करण्यात आला. या प्रसंगी रासेयो चे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या स्मुर्तीस अभिवादन करण्यात आले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयोचे स्वयंसेवक उपस्थित होते.

## २३ मार्च २०२१ - भगतसिंग जयंती – शहीद दिन साजरा

दि. २३ मार्च २०२१ रोजी सकाळी ९.०० वाजता महाविध्यालयात भगत सिंग यांच्या प्रतिमेस पुष्पमाळ अर्पण करून भगत सिंग यांची जयंती शहीद दिन म्हणून साजरा करण्यात आली. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयोचे स्वयंसेवक उपस्थित होते.

## २३ मार्च २०२१ जागतिक हवामान दिन साजरा

दर वर्षी २३ मार्च हा दिवस जागतिक हवामान दिन म्हणून साजरा करण्यात येतो. २३ मार्च २०२१ रोजी सकाळी ९.०० वाजता महाविध्यालयात जागतिक हवामान दिन साजरा करण्यात आली. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयोचे स्वयंसेवक उपस्थित होते.